क्रमांक : १००२०/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : १० जून, २०२६.

**संदर्भ :- १) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ३१०३०/क-१, दि.०४ डिसेंबर, २०१८**
**२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १६०६०/क-१, दि.२१ ऑक्टोबर, २०२१**

**:: परिपत्रक ::**

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकांन्वये या सचिवालयातील उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांनी विधिमंडळ समित्यांचे मुंबई बाहेरील अभ्यास दौरे करु नयेत तसेच या निदेशांचे अधिकाऱ्यांकडून तंतोतंत पालन करणेबाबत दक्षता घेणेसंदर्भात कळविण्यात आले होते.

या सचिवालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सभागृह व समित्यांशी निगडीत एकापेक्षा जास्त कक्षांचे कामकाज सोपविण्यात आलेले आहे. असे अधिकारी समिती समवेत मुंबई बाहेरील दौऱ्यांवर गेल्यास त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या अन्य कक्षांच्या कामकाजावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. तसेच या सचिवालयात मा.पीठासीन अधिकाऱ्यांद्वारे विविध विषयासंदर्भात निर्णय घेण्याच्या दृष्टीने नियमित बैठका तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करण्यात येते. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी मुख्यालयात उपस्थित असणे अत्यंत आवश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर उपरोक्त संदर्भाधीन दोन्ही परिपत्रकान्वये मा.मंडळाने उप सचिव व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांनी समितीच्या मुंबई बाहेरील अभ्यास दौरे करु नयेत असा निर्णय यापूर्वी घेतला होता.

तथापि, सद्य:स्थितीत समित्यांचे कामकाज पूर्ण क्षमतेने सुरू झाले आहे. त्यात समितीच्या नियमित बैठका व त्यानुषंगाने राज्यांतर्गत व राज्याबाहेरील अभ्यास दौरे देखील आयोजित करण्यात येतात. काही समित्यांवर मा.पीठासीन/मा.उप पीठासीन अधिकारी हे पदसिध्द (Ex-Officio) समिती प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. उक्त समित्यांच्या मुंबई व मुंबईबाहेरील बैठकांमध्ये भारतीय प्रशासकीय सेवा तसेच शासनाचे अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित असतात. समितीचे कामकाज अधिक प्रभावशाली व परिणामकारक होण्याच्या दृष्टीने दौरा कालावधीत समित्यांच्या कामकाजात देखील या सचिवालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर विधिमंडळातील नियमित कामकाज तसेच समित्यांच्या मुंबई व मुंबई बाहेरील अभ्यास दौऱ्यांमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीसंदर्भात योग्य तो समतोल राखण्यासाठी उक्त संदर्भाधीन दोन्ही परिपत्रके अधिक्रमित करून मा.मंडळाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

(१) ज्या समित्यांवर मा.पीठासीन/मा.उप पीठासीन अधिकारी पदसिध्द समिती प्रमुख (Ex-Officio) म्हणून कार्यरत आहेत, अशा समित्यांच्या मुंबई व मुंबई बाहेरील आयोजित दौऱ्याकरीता मा.पीठासीन/मा.उप पीठासीन अधिकारी आदेशित करतील ते अधिकारी उपस्थित राहतील.

(२) लोकलेखा समिती, अंदाज समिती व सार्वजनिक उपक्रम समिती या वित्तीय समित्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामकाजाशी निगडीत पंचायत राज समिती या समित्यांच्या मुंबई व मुंबई बाहेरील अभ्यास दौऱ्यास उपस्थित राहण्यास सह सचिव/सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी/उप सचिव/अवर सचिव/अवर सचिव (समिती) या संवर्गातील अधिकारी मा.मंडळाच्या मान्यतेने उपस्थित राहतील.

(३) उर्वरीत सर्व समित्यांच्या मुंबई व मुंबई बाहेरील अभ्यास दौऱ्यास उप सचिव/अवर सचिव/अवर सचिव (समिती) या संवर्गातील अधिकारी मा.मंडळाच्या मान्यतेने उपस्थित राहतील.

मा.मंडळाने दिलेल्या उपरोक्त निदेशांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करावे.

**(मेघना तळेकर)**
सचिव-२
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
९) या सचिवालयातील सर्व समिती प्रमुख यांची कार्यालये
१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष